# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.01.2025** **वारःशुक्रवार**

---

1. गेल्या दशकभरात देशात रोजगाराच्या प्रमाणात 36 टक्क्यांची वाढ- कामगार मंत्रालयाची माहिती
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीत विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन करणार
3. भाजपच्या पक्षांतर्गत निवडणुकासांठी विविध केंद्रीय मंत्र्याची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती आणि
4. बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतला 5 वा आणि अंतिम सामन्याला सिडनीमध्ये सुरुवात. भारतीय संघाची निराशाजनक सुरुवात

**<u>बेरोजगारी घट</u>**

गेल्या दशकभरात देशात रोजगाराच्या प्रमाणात 36 टक्के एवढी लक्षणीय वाढ झाली आहे. 2014 ते 2024 या कालावधीत 17 कोटी अतिरिक्त रोजगारांची निर्मिती झाल्याची माहिती कामगार आणि रोजगार मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षी देशात चार कोटी 60 लाख रोजगार निर्माण झाल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे. या दशकभरात कृषी क्षेत्रातल्या रोजगाराच्या संधींमध्ये 19 टक्क्यांनी, उत्पादन क्षेत्रात 15 टक्के तर सेवा क्षेत्रात 36 टक्क्यांनी वाढ झाल्याचं या आकडेवारीतून दिसून आलं आहे. 2017-18 ते 2023-24 या कालावधीत बेरोजगारीचा दर 6 टक्क्यांवरून कमी होऊन सुमारे सव्वा तीन टक्क्यांवर आला. पदवीधर तरुणांची रोजगारक्षमता 2013 मधल्या सुमारे 34 टक्क्यांवरून 2024मध्ये सुमारे 55 टक्क्यांवर पोहोचली. 18 ते 28 वर्ष वयोगटातल्या 4 कोटी 70 लाखांपेक्षा जास्त तरुणांनी ईपीएफओ, अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेत आपली नोंदणी केल्याचं मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात येणार आहे. जेजे क्लस्टर्समध्ये राहणाऱ्यांसाठी नव्यानं बांधण्यात आलेल्या जवळपास 17 शे सदनिकांचं ते उद्घाटन करणार असून राष्ट्रीय राजधानीच्या अशोक विहार भागातील पात्र लाभार्थींना या घरांच्या चाव्याही सुपूर्द करतील. जेजे क्लस्टर्समधील रहिवाशांना राहण्यासाठी अधिक चांगलं आणि निरोगी वातावरण उपलब्ध करून देणं हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. दिल्ली विद्यापीठाच्या जवळपास सहाशे कोटी रुपये खर्चाच्या तीन प्रकल्पांची पायाभरणीही पंतप्रधान मोदी करणार आहेत. तसंच नजाफगडच्या

रोशनपुरा भागातील वीर सावरकर महाविद्यालयाची कोनशिलाही आज त्यांच्या हस्ते बसविण्यात येणार आहे.

**<u>मासेमार माघारी</u>**

बांगलादेशच्या प्रशासनानं काल 95 भारतीय मासेमारांना बांगलादेश कोस्ट गार्डकडे सुपूर्द केलं असून, येत्या रविवारी त्यांना भारतीय तटरक्षक दलाकडे सोपवण्यात येणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वतीनं सांगण्यात आलं. याच दिवशी 90 बांगलादेशी मासेमारांनाही त्यांच्या देशाच्या हवाली करण्यात येणार आहे. उभय देशांच्या तटरक्षक दलांदरम्यानच्या परस्पर देवाणघेवाण आणि प्रत्यार्पण कार्यवाहीचा एक भाग म्हणून या मासेमारांची सुटका करण्यात येणार आहे. या देवाणघेवाणीवेळी या मासेमारांच्या ताब्यात घेतलेल्या नौकाही हस्तांतरित केल्या जाणार आहे. मानवतावादी भावनेतून आणि मासेमार समुदायाच्या उदरनिर्वाहाची काळजी लक्षात घेऊन ही सुटका करण्यात येत असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>भाजप नियुक्त्या</u>**

भारतीय जनता पार्टीनं प्रदेशाध्यक्ष आणि राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सदस्यांच्या निवडणुकांसाठी निवडणूक अधिकारी नियुक्त केले आहेत. त्यामध्ये केंद्रीय मंत्री आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचा समावेश आहे. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांची गुजरातसाठीनिवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून शिवराजसिंह यांच्याकडे कर्नाटकची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांच्या कडे बिहारसाठी नियुक्ती करण्यात आली असून धर्मेंद्र प्रधान मध्य प्रदेशातल्या पक्षाच्या निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवतील.

**<u>पायाभूत सुविधा प्रकल्प-युनिक आयडी</u>**

वैयक्तिक आधार कार्डाप्रमाणेच पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठीही आधार कार्डच्या माध्यमातून युनिक आयडी तयार करण्याचा निर्णय काल महाराष्ट्र सरकारनं घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. अनेक विभाग एकाच ठिकाणी एकाच प्रकारची विकास कामे करतात. त्यातून तीच ती कामे होऊन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. हे टाळण्यासाठी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाला युनिक आयडी असावा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे. प्रत्येक कामाची माहिती एका सामायिक ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे संतुलित विकास साधता येईल आणि निधी, श्रमशक्ती याचा सुयोग्य वापर होईल, असं फडणवीस म्हणाले. या योजनेचं प्रारूप निश्चित करून अहवाल देण्यासाठी एक समिती तयार करण्यात आली आहे.

**<u>वैष्णव</u>**

आसाममधील विविध विकास प्रकल्पांच उद्घाटन आज गुवाहाटी इथ केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राज्यपाल एल पी आचार्य, मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सारमा हे उपस्थित

राहणार आहेत. यावेळी गुवाहाटी- न्यू लखीमपुर जनशताब्दी एक्सप्रेससह तीन रेल्वे गाड्यांच उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून केल जाणार आहे. तसच एका रेल्वेपूलाच उद्घाटनही केल जाईल. कोकराझार आकाशवाणी केंद्राच्या 10 किलोवॅट प्रक्षेपकाच आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेच उद्घाटनही अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं गुवाहाटी इथ होणार आहे. मॉरिगऑन जिल्ह्यातल्या जगीरोड इथ उभारण्यात आलेल्या टाटा सेमी कंडक्टर कारखान्यालाही अश्विनी वैष्णव भेट देणार आहेत.

**<u>सीबीआय</u>**

भ्रष्टाचाराच्या विरोधात शून्य सहिष्णुता धोरणाचा एक भाग म्हणून केंद्रीय अन्वेषण विभागानं आपल्याच उप अधीक्षकासह अन्य काही जणांविरुद्ध लाच मागितल्याचा आणि विविध बँक खात्यांच्या तसंच हवालाच्या माध्यमातून ती स्वीकारल्याबद्दल गुन्हा नोंदवला आहे. सीबीआयच्या बँक सिक्युरिटीज आणि अपहार शाखेचे अधीक्षक बी. एम. मीना यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदविण्यात आला असल्याचं सीबीआयच्या अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. हा गुन्हा नोंदवण्यात आल्यानंतर जयपूर, कोलकाता, मुंबई आणि नवी दिल्लीत 20 ठिकाणी छापे टाकण्यात आले त्यामध्ये 55 लाख रुपयांची रोख रक्कम, मालमत्तेची कागदपत्रं हस्तगत करण्यात आल्याचंही निवेदनात म्हटलं आहे.

**<u>भीमा कोरेगाव</u>**

महाराष्ट्रात 2018 मध्ये झालेल्या भीमा कोरेगाव प्रकरणातील आपल्या कथित सहभागाच्या आरोपातून आपलं नाव वगळावं या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते आनंद तेलतुंबडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयए च्या विशेष न्यायालयानं मे 2024 मध्ये त्यांचं नाव या प्रकरणातून वगळण्याची त्यांची याचिका फेटाळली होती, त्या अनुषंगानं त्यांनी आता उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. तेलतुंबडे सध्या जामीनावर असून एल्गार परिषदेत त्यांनी केलेलं प्रक्षोभक भाषण 1 जानेवारी 2018 रोजी झालेल्या दंगलीस कारणीभूत असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

**<u>पानसरे</u>**

2015 मध्ये महाराष्ट्रात झालेल्या कॉमरेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासावर लक्ष्य ठेवण्याच काम थांबवण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने घेतला आहे. न्यायमूर्ती ए एस गडकरी आणि न्यायमूर्ती कमाल खता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. याबाबत दाखल करण्यात आलेली याचिका न्यायालयाने निकाली काढली आहे. मात्र या प्रकरणाची दररोज सुनावणी घेण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाने दिले आहेत. फेब्रुवारी 2015 मध्ये कोल्हापूर मध्ये गोविंद पानसरे यांची हत्या झाली होती. या हत्या प्रकरणाचा तपास प्रथम राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाकडे होता, मात्र ऑगस्ट 2022 मध्ये उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हा तपास दहशदवाद विरोधी पथकाकडे सोपवण्यात आला.

**<u>क्रीडा पुरस्कार</u>**

राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची काल घोषणा करण्यात आली. यामध्ये ऑलिंपिकमधे दोन पदकं जिंकणारी नेमबाज मनु भाकर, विश्वविजेता बुद्धिबळपटू डी गुकेश, पॅरा ॲथलिट प्रवीणकुमार आणि हॉकीपटू हरमनप्रित सिंह यांना यंदाचा मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळे याला अर्जुन पुरस्कार, तर नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 32 खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात पॅरा ॲथलिट सचिन खिलारी याचाही समावेश आहे. पॅरा जलतरणपटू मुरलीकांत राजाराम पेटकर आणि ॲथलिट सुचा सिंह यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं आज पुरस्कार विजेत्यांची नावं जाहीर केली. राष्ट्रपती भवनात 17 जानेवारीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांना सन्मानित केलं जाईल.

**<u>हॉकीलीग</u>**

हॉकी इंडिया लीग स्पर्धेत काल संध्याकाळी राऊरकेला इथं झालेल्या सामन्यात यूपी रुद्रा संघानं सुरमा हॉकी क्लबचा 3 विरुद्ध शून्य गोलांनी पराभव केला. या विजयामुळं यूपी रुद्रा तालिकेत अग्रस्थानी पोहोचला आहे.

**<u>क्रिकेट</u>**

बॉर्डर -गावसकर चषक कसोटी मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना सिडनी इथं खेळला जात आहे. यामध्ये शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या पहिल्या डावात 4 बाद 72 धावा झाल्या होत्या. तत्पूर्वी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.